# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई

(महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे स्थापित)

१८९-ए, पहिला मजला, आनंद कॉम्पलेक्स, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, चिंचपोकळी (प), मुंबई - ४०० ०११.

दुरध्वनी क्र.:- ०२२-२३००७६५०
संकेतस्थळ :-www.maharashtramedicalcouncil.in
ईमेल :-maharashtramcouncil@gmail.com


क्र.मवैप/कोविड समिट/वृत्त प्रसिध्द/२०२१/०१४३९ दिनांक :२९/०५/२०२१

## वृत्त प्रसिध्दीसाठी

### कोविड समिट-सद्य परिस्थिती आणि भविष्यातील सज्जता

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेद्वारे कोविड सद्य परिस्थिती आणि भविष्यातील सज्जता याबाबतचा शिखर परिषदेचा उदघाटन समारंभ दि.२९.०५.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजून २० मि. माननीय श्री. उध्दवजी बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाला. सदर शिखर परिषदेस माननीय श्री. अमितजी विलासराव देशमुख मंत्री, वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य, डॉ. शिवकुमार उत्तुरे, अध्यक्ष, डॉ. विंकी रुघवानी, उपाध्यक्ष, परिषदेचे सनमाननीय सदस्य, डॉ. तात्याराव लाहाने, संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, डॉ. साधना तायडे, संचालक आरोग्य सेवा तसेच महाराष्ट्र टास्क फोर्सचे सदस्य डॉ.संजय ओक, डॉ.शंशाक जोशी, डॉ.राहुल पंडित, डॉ.सुहास प्रभू, डॉ.आशेष भूमकर, डॉ.बकुल पारीख आणि तज्ञ डॉ.रमण गंगाखेडकर, डॉ.भावन जांखारिया, डॉ.अविनाश फडके, डॉ. जयेश लेले, डॉ.जलील पारकर, डॉ.उमा तेंडोलकर, डॉ.मंगेश तिवस्कर, डॉ.अनिता मॅथ्यूज आणि डॉ. शिल्पा संखे व इतर मान्यवर उपस्थित होते तसेच सदर शिखर परिषदेत अंदाजे २९,३९३ वैद्यकीय व्यवसायिक सहभागी झाले होते.

शिखर परिषदेच्या उदघाटन समारंभाच्या प्रारंभी डॉ.शिवकुमार उत्तुरे मा. अध्यक्ष, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यानी मनोगत व्यक्त केले की, शिखर परिषदेसाठी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयानी परिषदेचे आमंत्रन स्विकारुन आपले व्यस्त वेळापत्रकातून मोल्यवान वेळ दिल्याबददल त्यांचे ऋण व्यक्त केले. तसेच परिषदेने महाराष्ट्रात कोविड-१९ पहिली व दुसरी लाट व संभाव्य डॉक्टरांची उपलब्धता विचारा घेऊन जवळपास ८,५०० विद्यार्थ्याना तात्पुरती नोंदणी व जवळपास १२,५००

विद्यार्थ्याना कायमस्वरुपी नोंदणी देण्यात येऊन त्यांची सेवा कोविड रुग्णाच्या उपचारासाठी शासनास विक्रमी वेळेत उपलब्ध देण्याची भुमिका परिषदेने बजावली.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने कोविडबाबत शिखर परिषद आयोजित केल्याबददल परिषदेचे आभार मानले.

सदर शिखर परिषदेत मा.मुख्यमंत्र्यानी महाराष्ट्रात सध्या कोविड संसर्गाच्या दुसऱ्या लाटेच्या विळख्यात असून वैद्यकीय तज्ञांनी भविष्यात कोविड संर्वगाच्या तिसऱ्या लाटेचा अंदाज वर्तविला असुन त्याचा सामना वैद्यकीय व्यवसायिकानी कशाप्रकारे करावा याबाबत उपस्थित वैद्यकीय व्यवसायिकाना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, कोविड विषाणूची गेल्यावर्षी पहिली लाट व महाराष्ट्रात सध्याची दुसरी लाट यांची तुलना केली असता माहे मार्च मध्ये विषाणूचा संसर्ग न्युन्मतम पातळीवर होता तोच संसर्ग उच्चत्म पातळीवर जावून परत माहे संप्टेबर न्युन्मतम पातळीवर आला आहे. तथापि या वर्षी माहे मार्च मध्ये न्यूनतम पातळीवर न जाता सदर विषाणूच्या संसंर्गाने उच्चतम पातळी गाठली आहे.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, एक वर्षापुर्वी कोविड आजाराबददल जी दहशत डॉक्टरांमध्ये निर्माण झाली होती ती सध्या डॉक्टरांमध्ये दिसून येत नाही.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, "माझा डॉक्टर" या ब्रिद वाक्याने सर्व वैद्यकीय व्यवसायिक प्रेरित होऊन कोविड रुग्णाना सेवा देण्यास मैदानात उतरले असून त्यांना सेवा देण्यास सुरु केल्याबददल त्यांचे आभार मानले.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, डॉक्टरानी प्रथमतः कोविड किंवा नॉन कोविड रुग्ण कसे ओळखावे व कोविड रुग्णामध्ये सिम्टेमॅटीक किंवा नॉन सिम्टेमॅटीक कोविडची लक्षणे किती प्रमाणात आहे याची शहानिशा करुन त्याची वर्गवारी नुसार विभागणी करुन आवश्यकते प्रमाणे त्यांच्यावर औषधे उपचार करावे जेणे करुन औषधाचे दुष्परीणाम होणार नाही व आजारापैक्षा उपचार भयंकर होणार नाही हयाची खबरदारी घ्यावी तसेच मधुमेह रुग्णाच्या तपासण्या करुन स्टेरोइडस अतिप्रमाणात देण्यात येऊ नये जेणे करुन रुग्णाची प्रकृतीमान खालावणार नाही याची दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, मी सुरक्षीत तर माझे कुटुंब सुरक्षीत या ब्रिद वाक्याच्या अनुषंगाने रुग्णाना मार्गदर्शन करावे जेणे करुन माझा डॉक्टर या नात्याने दिलेला सल्ला रुग्णाला लाख मोलाचा ठरेल.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, डॉक्टरांकडे रुग्ण आल्यास त्याची तपासणी करुन तो रुग्ण कोविड बाधित आहे किंवा नाही याची शहानिशा करुन रुग्ण बाधित आढल्यास त्यानी लस घेतली आहे का ? कोणत्या कंपनीची घेतली आहे ? केव्हा घेतली आहे ? त्याला किती कालावधी झाला आहे ? याची माहिती वैद्यकीय व्यवसायिकानी संकलीत करणे आवश्यक आहे.

या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांनी विदीत केले की, महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड विशाणूची दुसरी लाट आली त्यावेळी महाराष्ट्र राज्यात ऑक्सिजनचा साठा अपुरा अपुरा असल्याने शासनाला दुसऱ्या राज्यातून ५०० मेट्रिक टन ऑक्सिजन मागविण्यात आला सदर बाब विचारात घेऊन प्रत्येक नर्सीगहोम/रुग्णालय ने ऑक्सिजन प्लान्ट तयार करणे गरजेचे आहे जेणे करुन भविष्यात येणाऱ्या संकटातून बाहेर पडण्याचे मार्ग सोपे होतील.

माननीय मुख्यमंत्र्यानी शिखर परिषदेचा उदघाटन समारोप प्रसंगी असे आवाहन केले की, परिषदेने आयोजित केलेल्या शिखर परिषदेच्या माध्यमातून सर्व वैद्यकीय व्यवसायिकांना मिळालेल्या प्रशिक्षणातून महाराष्ट्र राज्यास कोविड संकटातून बाहेर पडण्याचे दिशा मिळेल.

SDeshmukh

(संजय देशमुख)
प्रबंधक
महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई